**<u>प्रेसनोट</u>** **दि.१३/०२/२०२६**

## अपर तहसील कार्यालय बेला ता. उमरेड जि. नागपुर येथील महसुल सहायक यांचे विरूध्द नागपूर लाचलचुपत प्रतिबंधक विभागाने केली यशस्वी सापळा कारवाई.

यातील तक्रारदार यांनी त्यांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या नावामध्ये सातबारावर दुरुस्ती करण्यासाठी, तसेच आईचे नाव सातबारावरून कमी करण्यासाठी अपर तहसील कार्यालय, बेला, ता. उमरेड, जि. नागपूर येथे अर्ज केला होता. सदर कामाकरीता महसूल सहायक श्री. विजय भगवानजी शडमाकेयांनी तक्रारदाराकडे ४,००० रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ३,००० रुपये देण्याचे ठरले, त्यापैकी २,००० रुपये तक्रारदाराकडुनत्यावेळीच घेतले. उर्वरित १,००० रुपये नंतर देण्याकरीता महसूल सहायक श्री. विजय भगवानजी शडमाके यांनी सांगितले होते. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, नागपूर येथे तक्रार नोंदवली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा पडताळणीदरम्यान तक्रारदार यांचेकडुन महसूल सहायक श्री. विजय भगवानजी शडमाके यांनी पूर्वी घेतलेल्या २,००० रुपयांचा उल्लेख करून उर्वरित १,००० रुपये स्विकारण्याचे सहमती दर्शविली. आज दि. १३/०२/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूरचे पथकाने बेला येथे सापळारचला असता महसूल सहायक श्री. विजय भगवानजी शडमाकेयांनी तक्रारदाराकडून सातबारामध्ये नाव दुरुस्ती व नाव कमी करण्याचे मोबदल्यात उर्वरित १,००० रुपये लाच रक्कम पंचा समक्ष स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलीस स्टेशन बेला येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिंगबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर वश्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री. महेश कोंडावार,सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. मुयर चौरसीया व सापळा पथकातीलपोलीस निरीक्षक श्री. विवेक पडघान, पोहवा श्रीमती कांचन गुलबासे, श्री. अनिल चांदुरकर, नापोशि अमोल मेंघरे, पोशि. विकेश राऊत, चापोशि प्रिया नेवारे सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

नागपूर जिल्हयातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा.

**<u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा</u>**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसॲप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०